PRACTICE PAPER FOR MARATHI
PAPER-2

## SECTION A-GRAMMAR

१) पुढील वाक्ये कंसातील सूचनाप्रमाणे बदलून लिहा. ५

१)त्यांनंतर शाळेतील मुलांची भाषणे झाली. (वर्तमानकाळ करा)

२)यंदा दुष्काळ पडला पण पिके आली. (भविष्यकाळ करा)

३)आमची सहल थंड हवेच्या ठिकाणी जात आहे. (भूतकाळ करा)

४)येक भलीमोटी ईमारत बांथलि. (वाक्य शुद्ध करा)

५)माज्या डोल्यात पाणि आले. (वाक्य शुद्ध करा)

## SECTION B-COMPOSITION

२)दूरदर्शनवरील नाटकाची प्रतिक्रीया कळवणारे पत्र दूरदर्शन केंद्रास लिहा. ८

किंवा

ग्रंथालयप्रमुख म्हणून वर्गणीदारांना थकलेली वर्गणी भरायला सांगणारे पत्र लिहा.

३)खालील उतारा वाचून त्याचा एक तृतीयांश सारांश लिहा. ७

बागेतील झाडावर उमललेले एखादे टपोरे फूल असते.त्याचा सौम्यसा सुगंध आल्हाददायक असतो.त्याच्या नाजूक पाकळया आणि सुरेख रंग डोळयांना सुखवतात.हा छोटासा अनुभव घेतानाही आपले मन प्रसन्न होऊन जाते.इवल्याशा फांदीवर वा-याच्या लहरीवर डुलणारे ते फूल त्याच दिवशी संध्याकाळी कोमेजून जाते हे खरे; पण त्यामुळे त्याचे दिवसभरातील अस्तित्व आणि येणा-या जाणा-याला त्याने दिलेला आनंद या गोष्टी खोटया ठरू शकत नाहीत.आपणही आपले हे छोटेसे जीवन फुलासारखेच सुंदर करू शकतो.या नाशवंत जीवनाला त्याच्या अस्तित्वकालापुरता का होईना; पण काही अर्थ प्राप्त करून देऊ शकतो.तसे करण्यातच या जीवनाचे सार्थक आहे.या जीवनाचा प्रवास करत असताना आपल्या निकट राहून सोबत करणारी, आसपास राहून धीर पुरवणारी, आपल्यापेक्षा चार पावले चालत राहून प्रेरणा देणारी अशी निरनिराळया कोटीतील माणसे आपल्याला भेटतात.त्यांच्यापैकी काहींच्या सहवासामध्ये निरामय आनंदाचे क्षण लाभतात.आणखी कोणाच्या विचारांमधून अंत:करणाला काही दिलासा मिळतो आणि असामान्य विभूतींनी दाखवून दिलेल्या मार्गाच्या अल्पशा अनुकरणातून आपले जीवन उन्नत होते.या सा-या व्यक्तिंविषयी

उन्नतीचा भाव ठेवणे हे जीवनातील एक कर्तव्य ठरते.त्यांचे स्मरण जागवणे हा त्यांच्या ऋणांतून काही प्रमाणात उतराई होण्याचा मार्ग आहे.

४)खालीलपैकी एक कथा लिहा १०

१.लोभी माणूस- तपश्चर्या करणे-परमेश्वर प्रसन्न- सूर्य मावळेपर्यंत पळून येशील तेवढी जमीन तुझी- पळतच राहतो- सूर्यास्त होतो- शेवटी थकून मरून पडतो- अतिलोभामुळे मृत्यू.

२.वृद्ध शेतकरी- चार मुलगे- आपआपसात भांडणे- शेतकरी चिंतेत- चौघांना एकत्र बोलावणे- एक काठी मोडण्यास देणे- मोडून दाखवणे- नंतर मोळी तोडण्यास देणे- असफल- बोध

## SECTION C-COMPREHENTION

५) खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

हिंदूधर्म काही चहाच्या पेल्यात बुडून जाण्याइतका किंवा मिशा काढताच मरून जाण्याइतका लेचापेचा नाही.हिंदूधर्म तेव्हा मरेल जेव्हा बुद्धीची उपासना मरेल."आमची बुद्धी तेजस्वी राहो," ही गायत्री मंत्रातील प्रार्थना जेव्हा मरेल तेव्हा बुद्धीची उपासना मरेल.पंडित जवाहरलाल नेहरू स्नानसंध्या करत नसतील; परंतु ते जे काही करीत, ते त्यांच्या बुद्धीला त्या त्या वेळेस जे योग्य दिसेल ते करीत.ते गायत्री मंत्राचे आमरण उपासक होते.मरताना त्या महापुरूषाच्या ओठावर गायत्री मंत्र होता.

समाजात धर्म आहे की नाही हे कशावरून ओळखायचे? त्यागावरून! ज्यांच्याजवळ महान त्याग असेल तर त्यांच्याजवळ धर्म आहे.ज्या तरूणांना आज धर्महीन म्हणून म्हणण्यात येते, त्यांच्या जवळ जर त्याग असेल तर त्यांच्या जवळ धर्म आहे.पूर्वीची चित्रे, पूर्वीची प्रतीके, पूर्वीची व्रते व पूर्वीचे नियम यांत बदल होईल.नवीन व्रते व नवीन प्रतीके येतील.त्या त्या प्रतीकासाठी व व्रतासाठी प्राणार्पण करू पाहणारे तेज असले म्हणजे झाले.

इंग्लंडमधील बर्ट्रांड रसेल म्हणूना एक प्रज्ञावंत पुरूष आहे.त्याने एके ठिकाणी लिहले आहे की, नीती दोन प्रकारची असते.एक ऋण नीती समाजाच्या हिताचे काही एक करत नसते.माळा जपतील, तीन तीनदा स्नान करतील, भस्मे लावतील हे सारे ऋण नितीचे उपासक करतो; परंतु जर आपण त्याला विचारले,"समाजातील उपासमार दूर करण्यासाठी काय केलेस? स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी काय केलेस?" या सर्व प्रश्नांचे उत्तर काही नाही असेच येईल.याच्या उलट धन नीती असते.धन नीतीचा उपासक स्नान संध्या करत नसेल.देवदर्शनास कथाकथनास जात नसेल.माळा भस्मे यांची उपासना करत नसेल.परंतु समाजातील अन्याय दूर करण्यासाठी तो धाव घेतो.तो पददलितांची बाजू घेतो.जेथे संकट, जुलूम, अरेरावी असेल तेथे तो विराप्रमाणे उभा राहिल.वेळ पडली तर तो स्वतःचे बलिदानही देईल.

प्रश्नः

१. हिंदुधर्माविषयी कोणते विचार लेखकाने व्यक्त केले आहेत? २

२. लेखकाच्या मते मोतीलाल नेहरू खरे धार्मिक कसे? २

३. 'त्यांच्या जवळ धर्म आहे' असे म्हणता येईल जर २

अ) त्यांच्याजवळ उपासना असेल
ब) त्यांच्याजवळ ऋण नीती असेल
क) त्यांच्याजवळ त्याग असेल

४. ऋण नीती कशी दाखवली आहे? २

५. धन नीतीचा उपासक कोणाला म्हणता येईल? २

## SECTION D-LITERATURE

६) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा १५

१) खाँसाहेबांनी भाककरला कोणता उपदेश केला?
२) घराचे घरपण लेखिकेने कसे स्पष्ट केले आहे?
३) सावित्रीबाईच्या कार्याचे वर्णन करा.
४) लेखकाने हरिहररावांचे कोणरे गुण सांगितले?
५) आपल्या स्वप्नांच्या मालिकेचे वर्णन लेखकाने कसे केले आहे?

७) अ) खालील कोणत्याही एका प्रश्नांचे उत्तर एका वाक्यात लिहा २

१) कवीला लहान का व्हायचे आहे?
२) काय कामास येत नाही असे कवीला वाटते?
३) इवल्याशा पणतीने काय होईल?

ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नांचे उत्तर थोडक्यात लिहा ३

१) कसं चालेल हा प्रश्न कवीने कोणकोणत्या संदर्भात वापरला आहे?
२) अंधार पखाली या कवितेत कवीने कोणते प्रश्न विचारले आहेत?
३) आपल्या इच्छा पूर्ण करण्यासाठी कवी स्वतःत कोणते बदल अपेक्षितो?

क)खालीलपैकी कोणत्याही दोन संदर्भाचे स्पष्टीकरण करा. १०

१."घाम गाळण्याचा असा गड्या तुझा माझा वसा"

२."राहो बनून आकाश माझा शेवटचा श्वास"

३."तुकोबा जोतिबा मनोभावे स्मरू"

८) अ)प्रीतमचे वर्णन करा. ६

ब)गणपा रावसाहेबांकडे का आला? ४